*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ आयोजित मराठी राजभाषा दिन कार्यक्रम अहवाल

दि. २७ फेब्रुवारी २०१६

---

आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे मराठी भाषेचे रूप झपाट्याने बदलत असल्यामुळे मौखिक परंपरेतील ओवी छंदातील लोकवाङ्मय खंडित होण्याचा धोका निर्माण झाला असून त्याचे जतन करणे आपल्या सर्वांचे आद्यकर्तव्य असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवी प्रा. संतोष पवार यांनी व्यक्त केले ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी राजभाषा दिनानिमित्तच्या कार्यक्रमात "रंग कवितेचे" या विषयावर बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ एस. बी. पाटील, कला विभाग प्रमुख डॉ ए. एम. पवार, कवी संतोष गाढवे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. एम.एल. मुळूक, प्रा धनंजय वाघ, प्रा किरण गाढवे, प्रा. वर्षा कांबळे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थीउपस्थितहोते.

कवी संतोष पवार यांनी या प्रसंगी जगण्याला लय असली की कविता ओठात येते आणि आपल्याशी नाते जोडते त्यासाठी लयीला शब्दांची जोड हवी , असे सांगून आपल्या ग्रामीण भागातील स्त्रीयांचे दु:ख मांडणाऱ्या कविता सादर केल्या. 'माहेराला माती होती, सासरला माती माती, माती जन्माची सोबती' ही स्त्रीचे मातीशी नाते सांगणारी कविता अंतर्मुख करून गेली. वधूपित्याची भावना मांडणारी 'पदर आलेली कन्या, पदरमोड करून, तुमच्या पदरात घातली' ही कविता सादर केली. गावातील मुलगी पाण्याला जाताना तिच्यावर जो अतिप्रसंग घडला त्यामुळे तिचे जीवन उदधवस्त झाले याचे चित्रण करणारी कविता 'गावात पोर पाण्याला गेली, वाटेत गुंडा टाकून आली, धुळवडीचा दिवस होता, रंगात पोर माखून गेली' ही कविता उपस्थितांना हेलावून गेली. सोन्याबापू ही त्यांची समाज व्यवस्थेचे चित्रण करणारी आणि सरकारी पातळीवरील अकार्यक्षम व असंवेदनशील वृत्तीचे दर्शन घडविणारी कविता विचार करायला लावणारी होती. शेवटी त्यांनी आपल्या आईबद्दलची 'माय होतीच टसली , जशी चुलीची धसली , अशी जळली घरात , नाही धुराने धुपली ' अशी भावना व्यक्त करणारी कविता सादर करून मातृशक्तीचे महत्व विषध केले. राजभाषा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषेसमोरील आव्हाने या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली तसेच काही विद्यार्थ्यांनी सध्याच्या काळात वापरात नसलेले शब्द, म्हणी, वाक्प्रचार अशा सुमारे हजार शब्दांचा संग्रह केला. त्याबद्दल संतोष पवार यांनी मराठी विभागाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे यांनी केले तर आभार मराठी विभाग प्रमुख डॉ बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

डॉ बाळासाहेब अनुसे
मराठी विभाग प्रमुख




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कवी संतोष पवार



गुड मॉर्निंग

प्रभात पुणे, रविवार, दि. २८ फेब्रुवारी २०१६

**बदलत्या जीवनशैलीमुळे मराठीचे रूप बदलतेय**

प्रा. संतोष पवार : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राजभाषा दिन उत्साहात साजरा

राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी राजभाषा दिनानिमित्तच्या कार्यक्रमात बोलताना कवी प्रा. संतोष पवार

वर्तमानपत्रातील प्रसिद्धी



सकाळ
मंगळवार, १ मार्च २०१६
४

# लोकवाङ्मय जतन करणे सर्वांचे कर्तव्य

## राजगुरुनगरमध्ये कवी प्रा. संतोष पवार यांचे मत

राजगुरुनगर, ता. २१ : "आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे मराठी भाषेचे रूप झपाट्याने बदलत असून, मौखिक परंपरेतील ओवी इत्यादीतील लोकवाङ्मय लुप्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्याचे जतन करणे आपल्या सर्वांचे आद्यकर्तव्य आहे," असे मत कवी प्रा. संतोष पवार यांनी राजगुरुनगर येथे व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित मराठी राजभाषा दिनानिमित्तच्या कार्यक्रमात 'रंग कवितेचे' या विषयावर ते बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला विभागप्रमुख डॉ. ए. एम. पवार, कवी संतोष गाढवे, प्रा. किशोर लांडे-पाटील, प्रा. एस. एल. मुळूक, प्रा. धनंजय बाम, प्रा. किरण गाढवे, प्रा. वर्षा कांबळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

कवी पवार म्हणाले, "जगण्याला लय असली की कविता ओठात येते आणि आपल्याशी नाते जोडते. त्यासाठी लयीला शब्दांची जोड हवी," 'माहेराला माती होती, सासरला माती माती, माती जन्माची सोबती' ही स्त्रीचे मातीशी नाते सांगणारी कविता अंतर्मुख करून गेली. गावातील मुलगी पाण्याला जाताना तिच्यावर जो अतिप्रसंग घडला, त्यामुळे तिचे जीवन उद्ध्वस्त झाले, याचे चित्रण करणारी कविता 'गावात पोर पाण्याला गेली, वाटेत गुंडा टाकून आली, धुळवडीचा दिवस होता, रंगात पोर माखून गेली' ही कविता उपस्थितांना हेलावून गेली. सोन्याबापू ही त्यांची समाज व्यवस्थेचे चित्रण करणारी आणि सरकारी पातळीवरील अकार्यक्षम व असंवेदनशील वृत्तीचे दर्शन घडविणारी कविता विचार करायला लावणारी होती. शेवटी त्यांनी आपल्या आईबद्दलची 'माप हातांच टसली, जशी चुलीची घसली, अशी जळली घरात, नाही धुराने धुपली' अशी भावना व्यक्त करणारी कविता सादर करून मातृशक्तीचे महत्त्व विशद केले.

राजगुरुनगर (ता. खेड) : मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कविता सादर करताना प्रा. संतोष पवार.

राजभाषा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने 'मराठी भाषेसमोरील आव्हाने' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली, तसेच काही विद्यार्थ्यांनी सध्याच्या काळात वापरात नसलेले शब्द, म्हणी, वाक्प्रचार अशा सुमारे हजार शब्दांचा संग्रह केला.

मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मराठी विभागप्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

वर्तमानपत्रातील प्रसिद्धी